IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वरांची समाजक्रांती: एक ऐतिहासिक आणि वैचारिक पुनर्मूल्यांकन

**डॉ. रविंद्र पाडुरंग माने**

सहाय्यक प्राध्यापक (मानसशास्त्र विभाग)

शंकरराव मोहिते महविद्यालय, अकलूज

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***

*महात्मा बसवेश्वर*

**ABSTRACT**

भारतीय समाज मनाच्या जडणघडणीत १२ वे शतक हा एक क्रांतीकारी उषःकाल मानला जातो. या कालखंडात कर्नाटकच्या भूमीवर उदित झालेली महात्मा बसवेश्वरांची विचारप्रणाली केवळ एका धार्मिक पंथाची स्थापना नव्हती, तर ती प्रस्थापित विषमतेच्या आणि जड कर्मकांडांच्या विरोधात पुकारलेले एक महान वैचारिक युद्ध होते. ज्या काळात वर्णव्यवस्था, जातिभेद आणि बाह्य डामडौलाने मानवी प्रतिष्ठा पायदळी तुडवली होती, त्या काळात बसवण्णांनी 'माणूस' आणि 'विवेक' केंद्रस्थानी ठेवून क्रांतीचा नवा आराखडा मांडला.

या शोधनिबंधाचा उद्देश बसवेश्वरांची समाजक्रांती एक ऐतिहासिक आणि वैचारिक पुनर्मूल्यांकन यांचा अभ्यास करणे हा आहे संशोधनात प्राथमिक साधने म्हणून बसवेश्वरांचे वाचन साहित्य, समकालीन शरणांचे वचन आणि द्वितीय साधने म्हणून इतिहास ग्रंथ संशोधन, निबंध व प्रबंध, समाजशास्त्रीय तत्वज्ञान विषयक अभ्यास यांचा आधार घेतला जाईल. हा शोध निबंध बसवेश्वरांच्या या बहुआयामी समाजक्रांतीचा, त्यांच्या वचनांच्या (कवितांच्या) आधारे सविस्तर आढावा घेतो. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या समाजक्रांतीचे ऐतिहासिक व वैचारिक पुनर्मूल्यांकन करण्याचा प्रयत्न केला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Mane, Ravindra Padurang.** (2025). महात्मा बसवेश्वरांची समाजक्रांती: एक ऐतिहासिक आणि वैचारिक पुनर्मूल्यांकन. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **423–426.**

## ➢ प्रस्तावना

महात्मा बसवेश्वर (१२ वे शतक) हे समतावादी समाजक्रांतीचे प्रणेते होते, ज्यांनी जातिभेद, अस्पृश्यता आणि अंधश्रद्धेविरुद्ध लढा देऊन लिंगायत धर्माची स्थापना केली. त्यांनी 'वचन साहित्या'द्वारे सामान्य भाषेत समतेचा संदेश दिला, महिलांना समान अधिकार दिले आणि 'अनुभव मंटप' स्थापन करून लोकशाहीवादी विचारांचा पाया रचला. बाराव्या शतकातील कर्नाटकातील सामाजिक-धार्मिक परिस्थितीत महात्मा बसवेश्वरांनी उभारलेली चळवळ ही भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण समाजक्रांती मानली जाते. जातिव्यवस्था, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि स्त्री-पुरुष असमानता यांविरुद्ध त्यांनी वैचारिक व व्यावहारिक स्तरावर संघर्ष केला.

## ➢ संशोधनाची उद्दिष्टे

१. बसवेश्वरांच्या समाजक्रांतीची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करणे.
२. कायक, दासोह, समता या तत्त्वांचे वैचारिक विश्लेषण करणे.
३. अनुभव मंटपच्या संकल्पनेचे सामाजिक-राजकीय मूल्यमापन करणे.
४. आधुनिक सामाजिक न्यायाच्या संदर्भात त्यांच्या विचारांचे पुनर्मूल्यांकन करणे.

### १. ऐतिहासिक पार्श्वभूमी

बाराव्या शतकातील समाजात ब्राह्मणप्रधान व्यवस्था, कठोर जातिभेद, अस्पृश्यता आणि स्त्रियांवरील बंधने प्रबळ होती. धार्मिक कर्मकांडांना मोठे महत्त्व होते. अशा परिस्थितीत बसवेश्वरांनी समतेचा आणि श्रमप्रतिष्ठेचा विचार मांडून समाजपरिवर्तनाची चळवळ उभारली.

### २. बसवेश्वरांची वैचारिक भूमिका

(अ) कायक तत्त्व - “कायकवे कैलास” या तत्त्वानुसार प्रत्येकाने प्रामाणिक श्रम करणे हेच श्रेष्ठ आहे. श्रमाला प्रतिष्ठा देऊन त्यांनी समाजातील व्यवसायाधारित भेद कमी करण्याचा प्रयत्न केला.

(आ) दासोह तत्त्व - उत्पन्नातील अंश समाजहितासाठी वापरणे म्हणजे दासोह. यात सामाजिक समता व परस्परावलंबनाचा विचार दिसतो.

(इ) समता व मानवतावाद - बसवेश्वरांनी जातिभेद, लिंगभेद नाकारला. स्त्रियांना आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात समान स्थान दिले. त्यांच्या ‘वचन’ साहित्यामध्ये मानवतावादी दृष्टिकोन स्पष्ट होतो.

### ३. अनुभव मंटप : लोकशाहीची पायाभरणी

बसवेश्वरांनी स्थापन केलेले अनुभव मंटप हे विचारमंथनाचे व्यासपीठ होते. येथे विविध जाती-धर्मातील स्त्री-पुरुष मुक्तपणे विचार मांडत. आधुनिक लोकशाही संकल्पनेचा तो आरंभिक नमुना मानला जातो.

### ४. धार्मिक ढोंगीपणावर सक्रिय प्रहार आणि प्रत्यक्षवाद

बसवेश्वरांनी केवळ उपदेश केला नाही, तर तत्कालीन धार्मिक दांभिकतेवर सक्रिय हल्ला चढविला. त्यांनी मांडलेला 'प्रत्यक्षवाद' हा आजही आधुनिक वाटतो. माणसे जेव्हा दगडात कोरलेला साप पाहतात तेव्हा त्यावर दूध ओततात; पण खरा सर्पसमोर आला तर त्याला ठार मारायला धावतात, या विसंगतीवर त्यांनी नेमके बोट ठेवले आहे.

बसवेश्वरांचे एक प्रसिद्ध वचन (कविता):

*"कत्तलखान्यात आणलेले कोकरू,*
*त्याला सुशोभित करण्यासाठी त्याच्या गळ्यात घातलेल्या पानांचा हार खाते...*
*सर्पाने तोंडात पकडलेला बेडूक,*
*त्याच्या तोंडाजवळ उडणाऱ्या माशीला गिळण्याची इच्छा धरतो.*
*आपले जीवनही असेच आहे.*

यावचनातून बसवेश्वरांनी मानवी जीवनातील नश्वरता आणि अज्ञानाचे अत्यंत प्रभावी चित्रण केले आहे. कत्तलखान्यातील कोकरू जसे आपल्या मृत्यूच्या दारात असूनही गळ्यातील हार खाण्यात मग्न असते, तसाच माणूस ही मृत्यूच्या छायेत असताना ऐहिक सुखांच्या मागे धावत असतो. ही केवळ अध्यात्मिक शिकवण नसून, माणसाला त्याच्या अज्ञानातून जागे करणारी एक 'सामाजिक चपराक' आहे. बसवण्णांना यातून हे सांगायचे आहे की, बाह्य विधी आणि दिखाव्यापेक्षा जीवनाचे सत्य समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

**५. जाति व्यवस्थेचे निर्मूलन आणि श्रमाची नवी व्याख्या**

बसवेश्वरांनी ब्राह्मणवादी विचार प्रणालीतील पुनर्जन्माचा सिद्धांत आणि जातिविषयक जुन्या प्रमाणकांबद्दल स्पष्ट शंका व्यक्त केली. सामाजिक दृष्ट्या काही गट 'प्रदूषित' किंवा 'अस्पृश्य' असतात, ही कल्पनाच त्यांना अमान्य होती.

- व्यावसायिक समता : त्यांनी सिद्ध केले की, लोहार, परीट किंवा विणकर हे केवळ व्यवसायाने भिन्न आहेत, मात्र जन्माने सर्वसमान आहेत.
- कायकवे कैलास (श्रम हाच स्वर्ग) : त्यांनी संन्यासाचा मार्ग नाकारून 'कायक' म्हणजेच उत्पादक श्रमाला श्रद्धेचा दर्जा दिला.
- टाकसाळीचा सिद्धांत : बसवण्णांच्या मते, हे मर्त्य जग म्हणजे ईश्वराची 'टाकसाळ' आहे. जर एखादे नाणे (माणूस) येथे खोटे निघाले, तर ते परलोकातही खोटेच ठरेल. म्हणजेच, या जगात नीतीने आणि चांगल्या प्रकारे जगणे हीच खरी भक्ती आहे.

**६. ऐहिक जीवनाचा स्वीकार आणि इंद्रियनिग्रह**

बसवेश्वर हे केवळ निवृत्ती मार्गी संत नव्हते, तर ते 'कृतीवीर' होते. त्यांनी कौटुंबिक आणि राजकीय जीवनातील जबाबदाऱ्या पार पाडत असतानाच अध्यात्म जपले. बसवण्णा म्हणतात की, इंद्रिय सुखाचा आनंद न्याय्यरीतीने घेण्यात काहीही गैर नाही, मात्र त्या सुखावर व्यक्तीचे नियंत्रण असावे. इंद्रियांनी 'चाकराची' भूमिका बजावावी, 'जुलमी राजाची' नाही. संन्यस्त भाव म्हणजे जीवनाला नकार देणे नव्हे, तर जीवनातील विकृतींना दूर करणे होय. "विषय वासना गाडल्याने माणूस केवळ विकृतींचा धनी होतो," असे म्हणून त्यांनी मानवी भावनांच्या नैसर्गिक प्रकटीकरणाचा पुरस्कार केला.

**७. स्त्री-मुक्तीचा आणि समानतेचा उषःकाल**

लिंगायतांनी (वीरशैव) स्त्रियांसाठी समाजात अधिक चांगल्या दर्जाचा पुरस्कार केला. बसवेश्वरांनी स्त्रियांच्या भोवती उभारलेली अशास्त्रीय आणि अधार्मिक कुंपणे मोडून काढली.

- वैचारिक नेतृत्व :त्यांनी स्त्रियांना 'शरण' म्हणून दर्जा दिला आणि त्यांना धर्मोपदेशक होण्याचे स्वातंत्र्य दिले.
- विधवा विवाह : ज्या काळात विधवांचे जीवन नरकप्राय होते, त्या काळात बसवेश्वरांनी विधवा विवाहास प्रोत्साहन देऊन एक धाडसी सामाजिक पाऊल उचलले.

**८. राजकीय आणि प्रशासकीय क्रांती**

बसवेश्वर हे केवळ तत्वज्ञ नव्हते, तर ते कल्याणी येथील कलचुरींच्या दरबारात पंतप्रधान (महामंत्री) होते. त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग वैयक्तिक लाभासाठी न करता, समाज परिवर्तनासाठी केला. त्यांनी 'अनुभवमंटप' नावाची जगातील पहिली लोकशाही संसद उभी केली, जिथे राजापासून ते कष्टकरी वर्गापर्यंत सर्वांना एकाच पातळीवर बसून विचार मांडण्याचा अधिकार होता.

**९. ऐतिहासिक पुनर्मूल्यांकन**

इतिहासकारांच्या मते बसवेश्वरांची क्रांती ही केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक-आर्थिक सुधारणांची चळवळ होती. काही अभ्यासकांच्या मते ती तत्कालीन सत्ताकेंद्रांना आव्हान देणारी होती; तर काहींच्या मते ती आध्यात्मिक सुधारणांपुरती मर्यादित होती. तथापि, समतेचा व मानवतेचा मूलभूत संदेश आजही प्रासंगिक आहे.

**१०. वैचारिक पुनर्मूल्यांकन**

आजच्या संविधानिक मूल्यांच्या दृष्टीने पाहता समता, बंधुता, स्वातंत्र्य ही तत्त्वे बसवेश्वरांच्या विचारांशी सुसंगत दिसतात. त्यामुळे त्यांची समाजक्रांती आधुनिक सामाजिक न्यायाच्या संकल्पनांना पूरक ठरते.

- **समारोप**

महात्मा बसवेश्वरांची समाजक्रांती ही भारतीय सामाजिक इतिहासातील महत्त्वाची घटना आहे. त्यांनी मांडलेले कायक, दासोह आणि समतेचे तत्त्व आजही समाजपरिवर्तनासाठी प्रेरणादायी आहेत. ऐतिहासिक व वैचारिक पुनर्मूल्यांकनातून हे स्पष्ट होते की बसवेश्वरांची चळवळ ही केवळ धार्मिक सुधारणा नव्हे, तर व्यापक सामाजिक जागृतीची चळवळ होती. महात्मा बसवेश्वरांची समाजक्रांती ही भारतीय इतिहासातील परिवर्तनवादी चळवळ आहे. संशोधन पद्धतीच्या आधारे केलेल्या विश्लेषणातून हे स्पष्ट होते की त्यांनी सामाजिक समता, श्रमप्रतिष्ठा व मानवतावाद यांचा पुरस्कार करून व्यापक सामाजिक जागृती घडवून आणली.

महात्मा बसवेश्वरांची समाजक्रांती ही केवळ शब्दांची जुळवा जुळव नव्हती, तर ती रक्तामांसाच्या माणसांसाठी केलेली

कृती होती. त्यांनी धार्मिक ढोंगीपणावर सक्रिय हल्ला चढवून मानवी सदसद्विवेकबुद्धीला जागृत केले. संन्यास न स्वीकारताही शुद्ध आचरण कसे असावे, याचा आदर्श त्यांनी स्वतःच्या जीवनातून घालून दिला. आज ८०० वर्षांनंतरही, त्यांनी मांडलेले जाती निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता आणि श्रमाची प्रतिष्ठा हे विचार आधुनिक लोकशाहीचा कणा मानले जातात. खऱ्या अर्थाने, बसवेश्वर हे काळाच्या पुढे पाहणारे एक 'बंडखोर महामानव' होते.

➢ संदर्भ ग्रंथ सूची

१. तिप्पे रुद्र स्वामी, एच.; *भारतीय साहित्याचे निर्माते: बसवेश्वर*, (अनु. रोहिणी तुकदेव), साहित्य अकादेमी,
२. देशमुख, गोपाळराव; *दोन राजधान्या मंगळवेढा ब्रह्मपुरीचा इतिहास*, कौशल्या प्रकाशन, २०१४.
३. भगत, रा. तु. (संपा.); *संत साहित्य आणि समाजप्रबोधन*, दिलीपराज प्रकाशन, पृ. १९-२५.
४. आंबेडकर, बी. आर. (डॉ.); *शूद्र पूर्वी कोण होते?*, प्रबुद्ध भारत प्रकाशन.
५. प्रा. डॉ. शिवकुमार उपासे; क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर, सकाळ मीडिया प्रा. लि. पुणे, प्रथम आवृत्ती, डिसेंबर, २०२३
६. डॉ. सोमनाथ रोडे; सामाजिक क्रांतीचे जनक : महात्मा बसवेश्वर, अश्विनी प्रकाशन, लातूर, एप्रिल, २००९